मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवडमध्ये 40 कोटींचे "फुलपाखरू"

## "बटरफ्लाय" पुलाच्या कामात भ्रष्टाचार? : वाढीव खर्चाबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिंचवडगाव येथून थेरगावकडे जाण्यासाठी पवना नदीवर फुलपाखरु (बटरफ्लाय) आकाराचा पूल उभारला आहे. हा पूल उभारताना महापालिकेकडून २५ कोटी रुपये खर्च केले जाणार होते. परंतु, २५ कोटींचा खर्च अचानक सुमारे ४० कोटींवर गेला असून हा वाढीव खर्च कसा झाला, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत कामाची सखोल चौकशी करुन १५ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नेमका कशावर केला? यांची तज्ज्ञांकडून चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे.



विशेष म्हणजे, याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीत म्हटले आहे की, थेरगाव येथील प्रसुनधाम हौसिंग सोसायटी शेजारी १८ मीटर विकास आराखड्यातील रस्त्यावर चिंचवडगाव-थेरगाव हा फुलपाखरू (बटरफ्लाय) पूल बांधण्याचे काम महापालिकेने २०१७ मध्ये हाती घेतले. हा पूल थेरगाव आणि चिंचवड अशा दोन गावांना जोडणारा आहे. निविदा खर्च २५ कोटी १९ लाख रुपये अपेक्षित धरण्यात आला होता. त्यामध्ये धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांनी १४ टक्के म्हणजेच २८ कोटी ७१ लाख रुपयांची निविदा भरली. अन्य दोन ठेकेदारांपेक्षा त्यांचा दर कमी असल्याने त्यांना या पुलाचे बांधकाम देण्यात आले.

पुलाची १०७ मीटर लांबी, तर १८ मीटर रुंदी आहे. १८ महिन्यांच्या मुदतीत पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे कामाला दि. ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर या पुलासाठी थेरगाव बाजूकडील पोहोच रस्त्यास भिंत बांधणे, मुरूम टाकून भराव करणे, रस्त्याचे 'सबग्रेड'चे काम व डांबरीकरण करणे, तसेच चिंचवड बाजूकडील रस्त्याचे 'सबग्रेड'चे काम, डांबरीकरण आणि दिशादर्शक फलक अशी कागे पूर्ण करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. त्यासाठी ११ कोटी तीन लाख रुपयांचे काम एस.सी. कटारीया या ठेकेदाराला देण्यात आले. ऑगस्ट २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला. कामाची मुदत सप्टेंबर २०२४ पर्यंत होती. या मुदतीत काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे २६ जानेवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

### पुलाच्या कामाचा खर्च 39 कोटींहून अधिक..

» दरम्यान, पुलाला जोडणाऱ्या एका बाजूचे काम अपूर्ण आहे. या मुदतीतही काम पूर्ण होण्याची शक्यता नाही. त्यामुळे पुलाच्या दोन टप्प्यातील कामावर ३९ कोटी ७४ लाख रुपये खर्च होऊनही पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना पुलाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. दरम्यान, बटरफ्लाय पुलाचे काम २५ कोटी रुपयांवरुन ४० कोटी रुपयांवर जाऊनही हे काम मुदतीत पूर्ण झालेले नाही. या पुलाच्या कामांमध्ये संबंधित ठेकेदार, अधिकारी, सल्लागार व लोकप्रतिनिधी यांनी संगनमत करून मोठा भ्रष्टाचार केला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची तज्ञ लोकांकडून सखोल चौकशी करून यातील दोषींवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणी भापकर यांनी केली आहे.

# अवैध सावकारी करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई

## अवैधरीत्या सावकारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : पोलीस आयुक्तांचा आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

अवैध सावकारीच्या त्रासातून कर्जदाराने जीवन संपविल्याच्या शहरात पंधरा दिवसांत दोन घटना घडल्याने पोलिसांनी अवैध सावकारी विरोधात कडक पाऊल उचलले आहे. अवैधरीत्या सावकारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे.




खासगी सावकाराच्या तगाद्याला कंटाळून वडिलांनी दहा वर्षांच्या मुलाचा खून केला. त्यानंतर दाम्पत्याने गळफास लावून घेतला. त्यात आईचा मृत्यू झाला; तर वडील बचावले. ही घटना चिखली येथील सोनवणे वस्ती येथे घडली. अशीच घटना तीन जानेवारीला चिंचवड स्टेशन येथे घडली. सावकाराच्या जाचाने रिक्षाचालक राजू राजभर याने गळफास घेऊन आत्महत्या केली. पंधरा दिवसांत या दोन घटना घडल्या.

पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध सावकारीची काही प्रकरणे निदर्शनास येत असल्याने अशा गुन्हेगारांच्या कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी पावले उचलली आहेत. अवैध सावकारी संदर्भात नागरिकांनी तक्रारी देण्यास पुढे यावे. यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. नागरिकांकडून भरमसाट व्याजाने पैसे उकळणारे, नागरिकांना छळ आणि धमक्या देणाऱ्या सावकारांविरुद्ध तत्काळ कठोर कार्यवाही करण्याचा आदेश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्तांनी दिला आहे.

# पुण्यात गुइलेन-बॅरे सिंड्रोमचे रुग्ण वाढले

## बाधितांमध्ये सर्वाधिक लहान मुले : वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिल्या महत्त्वाच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरचे रुग्ण वाढत आहेत. आतापर्यंत एकूण ५९ लोकांना या आजाराचे निदान झाले आहे. यापैकी १२ जण व्हेंटिलेटरवर आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी बुधवारी राज्य आणि नागरी आरोग्य अधिकाऱ्यांची बैठक बोलावून परिस्थितीचा आढावा घेतला. यामध्ये रुग्णालयांनी जीबीएसची प्रकरणी पुणे महापालिकेकडे (पीएमसी) अहवाल दिला.



त्यांनी द इंडियन एक्स्प्रेसला सांगितले की, अधिकाऱ्यांना बाधित व्यक्तींचा सखोल वैद्यकीय इतिहास घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जीबीएस हा एक स्वयंप्रतिकार रोग आहे, जो शरीराच्या मज्जातंतूंवर हल्ला करणारे अँटीबॉडीज तयार करतो. "हे एकतर गॅस्ट्रोइंटेस्टाइनल किंवा इन्फ्लूएंझा सारख्या आजाराचा परिणाम आहे. परंतु या आजाराला घाबरण्याची गरज नाही", असं डॉ पुलकुंडवार म्हणाले. लोकांना पिण्यासाठी पाणी उकळण्याचे, शिळे किंवा उघड्यावरचे अन्न खाणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्याच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, ५९ रुग्णांपैकी ३३ रुग्ण पुण्यातील ग्रामीण भागातील, ११ महापालिका हद्दीतील आणि १२ पिंपरी चिंचवड महापालिकेतील आहेत. तीन रुग्ण इतर जिल्ह्यातील आहेत.

### कोणत्या वयोगटाला सर्वाधिक धोका?

बाधितांमध्ये अकरा मुले ०-९ वयोगटातील आहेत आणि १२ १०-१९ वयोगटातील आहेत. सात रुग्ण २०-२९ वयोगटातील आहेत तर प्रत्येकी आठ रुग्ण ३०-३९ आणि ४०-४९ वयोगटातील आहेत. पाच रुग्ण ५०-५९ वयोगटातील, सात रुग्ण ६०-६९ वयोगटातील आणि एक व्यक्ती ७०-८० वयोगटातील आहे. आतापर्यंत एकूण बाधितांमध्ये ३८ पुरुष आणि २१ महिला रुग्ण आहेत. त्यांना विविध हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### काळजी करण्याचे कारण नाही

संसर्गजन्य रोग सल्लागार डॉ अमित द्रविड यांनी लोकांना घाबरू नये असे आवाहन केले. कारण कॅम्पिलोबॅक्टर संसर्ग असलेल्या प्रत्येक एक हजार लोकांपैकी फक्त एकाला हा आजार होतो.

### गुइलेन बॅरे सिंड्रोमची लक्षणे

» गुइलेन बॅरे सिंड्रोमची लक्षणे सहसा अचानक दिसू लागतात. ही लक्षणे काही दिवसांत किंवा आठवड्यात वेगाने वाढू लागतात. सामान्य लक्षणांमध्ये अशक्तपणा आणि हातापायांना मुंग्या येणे आदी लक्षणांचा समावेश होतो. मुंग्या येणे अनेकदा पायांमध्ये सुरू होते आणि हात व चेहऱ्यापर्यंत पसरू शकते. लोकांना चालण्यातही त्रास होतो; ज्यामुळे हालचाल करण्यात अडचणी येऊ शकतात.

### गुइलेन बॅरे सिंड्रोम कशामुळे होतो?


» या आजाराची लागण होण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे कॅम्पिलोबॅक्टर जेजुनी (पोल्ट्रीतील कोंबड्यांचे कच्चे किंवा कमी शिजलेले मांस खाल्ल्याने किंवा हाताळल्याने) या विषाणूचे संक्रमण. तसेच एपस्टाईन-बॅर व्हायरस, सायटोमेगॅलॉव्हायरस किंवा झिका व्हायरससारखे संक्रमण झाल्यासही याची लागण होते. या संक्रमाणामुळे रोगप्रतिकारक शक्ती उत्तेजित होते, जी नसांना लक्ष्य करते. काही प्रसंगी, इन्फ्लूएन्झा किंवा टिटॅनससारख्या काही लसी गुइलेन बॅरे सिंड्रोमसाठी कारणीभूत ठरू शकतात. परंतु, लसीकरणाच्या फायद्यांच्या तुलनेत याचा धोका अत्यंत कमी आहे.

# पिंपरीत साकारणार मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय

## 15 मजली निवासी इमारत : तब्बल 126 कोटी 24 लाख 30 हजार 273 रुपये खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधीनगर, पिंपरीसमोरील महिंद्रा कंपनीच्या जागेत मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय उभारण्यात येणार आहे. त्यात 8 मजली प्रबोधिनी इमारत, 15 मजली निवासी इमारत, 22 अग्निशमन बंब बसतील अशी पार्किंग, अग्निशमन कार्यालय व कार्यशाळा, संग्रहालय व प्रेक्षागृह असणार आहे. त्यासाठी तब्बल 126 कोटी 24 लाख 30 हजार 273 रुपये खर्च करण्यात येणार आहे.



अग्निशमन विभागाचे मध्यवर्ती मुख्यालय सध्या संत तुकारामनगर येथे आहे. तेथील जागा अपुरी पडत असल्याने नव्या प्रशस्त ठिकाणी मुख्यालय बांधण्याचा नियोजन होते. गांधीनगर, पिंपरी येथील महिंद्रा कंपनीकडून 'आयटूआर' अंतर्गत मिळालेल्या 5.5 एकर जागेत हे मुख्यालय बांधण्यात येणार आहे.

त्या जागेत 8 मजली प्रबोधिनी इमारत उभारली जाणार आहे. त्या फायरमन व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तर, अग्निशमन विभागात काम करणारे फायरमन, जवान, चालक व इतर कर्मचाऱ्यासाठी 15 मजली निवासी इमारत बांधण्यात येणार आहे. त्यात 22 अग्निशमन बंब उभे करता येतील, अशी प्रशस्त पार्किंग असणार आहे. तसेच, अग्निशमन कार्यालय व कार्यशाळा असणार आहे. अग्निशमन संग्रहालय, दोनशे जणांच्या आसन क्षमतेचे प्रेक्षागृह, 50 आसन क्षमतेचे सेमिनार रूम, 100 प्रशिक्षणार्थी व 118 अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असणार आहे. तसेच, कवायत करण्यासाठी मैदान असणार आहे. इतर वाहनांची दोन मजली पार्किंग व्यवस्था आहे.

या मुख्यालयास गांधीनगर झोपडपट्टीच्या बाजूने प्रवेशद्वार आहे. भविष्यात इतर बाजूने इतर मार्ग शोधण्यात येणार आहेत. मात्र, अग्निशमन बंब ये-जा करण्यास दर्शनी भागात पुरेशी जागा उपलब्ध नसल्याचे वाहतुकीचा खोळंबा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### नव्या महापालिका भवनामुळे अग्निशमन मुख्यालयाचा प्रस्ताव रद्द

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने गांधीनगर, पिंपरी येथील महिंद्रा कंपनीच्या जागेत मध्यवर्ती अग्निशमन मुख्यालय बांधण्याचा निर्णय झाला होता. पुढे त्या ठिकाणी महापालिका भवनाशेजारी जागा असल्याने महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत उभारण्यात निर्णय झाला. त्यासाठी दोन्ही इमारती पादचारी मार्गाने जोडण्यात येणार होत्या. तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेचे इमारत दर्शनी भागात हवी, असे सांगितल्याने तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी तो निर्णय रद्द केला. त्यानंतर चिंचवड येथील सायन्स पार्कसमोर 18 मजली महापालिका भवन उभारण्याचा निर्णय झाला. ते काम सध्या वेगात सुरू आहे. त्यामुळे आता गांधीनगरच्या जागेत अग्निशमन मुख्यालय बांधण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# हवा आणि ध्वनिप्रदूषणाच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणे भोवले

## महापालिकेने हवा आणि ध्वनिप्रदूषण करून पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बिल्डरांवर प्रथमच कारवाईचा बडगा उगारला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

हवा प्रदूषण करत पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन बांधकाम व्यावसायिकांच्या बांधकाम प्रकल्पांच्या कामाला बांधकाम विभागाने स्थगिती दिली आहे. त्यातील दोन बिल्डरांवर तब्बल पावणेदोन लाख रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे. महापालिकेने हवा आणि ध्वनिप्रदूषण करून पर्यावरण नियमांचे उल्लंघन करत उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या बिल्डरांवर प्रथमच कारवाईचा बडगा उगारला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात नागरीकरण वेगाने होत आहे. त्यामुळे बांधकाम प्रकल्पांची संख्यासुद्धा झपाट्याने वाढत आहे. शहरातील वाढते औद्योगिकीकरण, बांधकामांमुळे हवा व ध्वनिप्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच हवेचा निर्देशांक खराब होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

महापालिकेने नागरिकांना चांगले जीवनमान देण्याच्या हेतूने शाश्वत, पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती स्वीकारली आहे. याकरिता महापालिकेने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार औद्योगिक आणि बांधकाम प्रदूषणावर पाळत ठेवणारी यंत्रणा नेमण्यात आली. ३२ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसह आठ वॉर्डांमध्ये, उल्लंघनाच्या सदैव निरीक्षणासाठी यंत्रणेचे कर्मचारी तैनात करण्यात आले. त्यानुसार शहरातील हवा, ध्वनी आणि जल प्रदूषण करत पर्यावरण नियमांचे उल्लंघन करण्यावर कडक कारवाईचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले होते.



### इंदापूरचा शेतकरी प्रयोगशील -भरणे

» टप्पा १ - (हवा गुणवत्ता निर्देशांक १०१ - ३००) : रस्त्यावरील धूळ नियंत्रित करणे, बेकायदेशीर कचऱ्याची विल्हेवाट लावणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार.
» टप्पा २ - (हवा गुणवत्ता निर्देशांक ३०१ - ४००) : डिझेल जनरेटरवरील निर्बंध, रस्त्यांची स्वच्छता आणि सार्वजनिक वाहतुकीचा प्रचार यांचा समावेश आहे.
» टप्पा ३ - (हवा गुणवत्ता निर्देशांक ४०१- ५००) : अत्यंत प्रदूषण करणारे उद्योग बंद करण्यात येणार, वाहनांचे प्रतिबंधात्मक क्षेत्र तयार करून उल्लंघनावर कठोर दंड आकारण्यात येणार.-
» टप्पा ४ - (हवा गुणवत्ता निर्देशांक ५०० हून अधिक) : प्रदूषणाला आळा घालण्यासाठी वाहन बंदी, संभाव्य शाळा बंद आणि कडक दंड लागू करण्यात येणार.

### 10 टक्के वस्तूच्या पुनर्वापराची सक्ती

» महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोत बांधकाम आणि बांधकाम राडारोडा व्यवस्थापन प्रकल्प (सी अँण्ड डी वेस्ट मॅनेजमेंट) आहे. या बांधकाम राडारोड्यातून दररोज १५० मेट्रिक टन बांधकाम कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. नवीन नियमानुसार बांधकाम व्यावसायिकांनी त्यांच्या प्रकल्पातून मिळणाऱ्या किमान १० टक्के पुनर्प्रक्रिया केलेल्या वस्तू वापरासाठी घेणे बंधनकारक केले आहे. या नियमाचे बांधकाम व्यावसायिकांनी पालन न केल्यास त्यांना भोगवटा प्रमाणपत्र (बिल्डिंग कंप्लेशन सर्टिफिकेट) दिले जाणार नाही, असा नवीन नियम करण्यात आला आहे.

“ हवा व ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून बांधकाम व्यावसायिकांना योग्य त्या उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. बांधकाम परवानगी देताना संदर्भ क्रमांक ५ मधील आदेशानुसार बांधकाम करणे अपेक्षित आहे. त्यानुसार हवा प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी अंमलबजावणी होताना दिसत नाही. त्यामुळे पर्यावरण नियमांचे उल्लंघन होत आहे. चालू असलेल्या बांधकाम ठिकाणी कुठल्याही प्रकारची हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजना नसल्यास बिल्डरांवर दंडात्मक कारवाईसह बांधकामांना स्थगिती देण्यात येईल.

**- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# औद्योगिक तक्रार निवारण पथकाची स्थापना; उद्योगांना मिळणार भयमुक्त वातावरण; पोलीस आयुक्तांनी दिली ग्वाही

## पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आता औद्योगिक तक्रार निवारण पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगपूरक वातावरण निर्मिती व उद्योजकांच्या अडीअडचणींवर तत्काळ कार्यवाही होण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आता औद्योगिक तक्रार निवारण पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे प्रमुख सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उद्योगपूरक वातावरण निर्मिती व उद्योजकांच्या अडीअडचणींवर तत्काळ कार्यवाही होण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आता औद्योगिक तक्रार निवारण पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे. या पथकाचे प्रमुख सहायक पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तलयाअंतर्गत सुमारे ४० ते ४५ लाख इतकी लोकसंख्या आहे. आळंदी- मरकळ, भोसरी, चाकण, हिंजवडी, तळेगाव दाभाडे ही औद्योगिक क्षेत्र आयुक्तालयाच्या अखत्यारीत येतात. या ठिकाणी सुमारे दोन हजार छोट्या आणि तीनशे ते चारशे मोठ्या कंपन्या आहेत. उद्योगांना भयमुक्त वातावरण मिळावे, यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी २१ मार्च २०२३ रोजी औद्योगिक तक्रार निवारण पथकाची स्थापना केली होती. या अगोदर खंडणी विरोधी पथकांतर्गत औद्योगिक तक्रार निवारण पथकाचे कामकाज सुरू होते. या कक्षाचे प्रमुख पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी होते. दोन पथकाचे एकत्र कामकाज असल्याने कोणत्यातरी एका पथकासाठी पूर्ण वेळ देणे शक्य होत नव्हते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील तक्रार निवारणासाठी पथकाची नव्याने स्थापना करण्यात आली आहे.

या पथकात लवकरच इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहेया औद्योगिक पथकाचे कार्यक्षेत्र पिंपरी-चिंचवड आयुक्तालय असून, औद्योगिक आस्थापना संदर्भात घडलेल्या गुन्ह्यांचा तपास या पथकाकडून केला जाणार आहे. औद्योगिक क्षेत्रात खंडणी मागणे, अशांतता माजवणे यासारखे गुन्हे होणार नाहीत, याबाबत पथकाकडून प्रतिबंधक उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. औद्योगिक तक्रार निवारण पथकाच्या प्रमुखांना गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्तामार्फत पोलीस आयुक्तांना अहवाल सादर करावा लागणार आहे.

### व्यक्तिगत भेटींवर देणार भर

» शहरातील औद्योगिक जगताच्या समस्याच जाणून घेत त्यांच्या समस्याच सोडवण्यासाठी उपायुक्त डॉ. विशाल हिरे यांनी प्रत्येक उद्योजकांशी संवाद साधण्यावर भर दिला आहे. उद्योजकांना थेट हिरे यांच्याकडे आपल्या अडचणी मांडता येणार आहेत. त्यामुळे शहरात उद्योजकांना भयमुक्त वातावरणात वाटचाल करता येणार आहे.

# दूध धंद्यात इंदापूरचा राज्यात लौकीक

## कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे गौरवोद्गार : कृषी महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ तरुण असतानाही नवीन तंत्रज्ञान शेतीतील अद्यावत पॅटर्न तालुक्यातील गावागावापर्यंत पोहोचवण्यासाठी कृषी महोत्सवाच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न करत आहे. मी अनेकदा इंदापूरला आलो आहे. दूध धंद्याच्या बाबतीत मोठी प्रगती आहे, महाराष्ट्रामध्ये इतकी प्रगती करणारा दुसरा तालुका नाही. असे गौरवोद्गार राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काढले.

कृषी उत्पन्न बाजार समिती इंदापूर आयोजित पाच दिवसीय कृषी महोत्सवाचे उद्घाटन मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते व राज्याचे क्रीडा व अल्पसंख्यांक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी अखिल भारतीय द्राक्ष बागायदार संघाचे अध्यक्ष कैलास भोसले, पुणे जिल्हा बँकेचे संचालक व बाजार समितीचे माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे, माजी आमदार यशवंतराव माने, सभापती तुषार जाधव, कर्मयोगी शंकरराव पाटील साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन भरत शहा, नीरा भीमा साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन कांतीलाल झगडे, माजी सभापती विलासराव माने, उपसभापती मनोहर ढुके, मधुकर भरणे, दत्तात्रय फरतडे, रोहित मोहोळकर, संग्रामसिंह निंबाळकर, आबा देवकाते, दशरथ पाटील पोळ, मंगलाताई झगडे, रूपालीताई वाबळे, रोनक बोरा, बाजार समितीचे सचिव संतोष देवकर यांच्यासह तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषिमंत्री कोकाटे म्हणाले, मागील काही दिवसांपासून मेहनत घेऊन वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल लावले आहेत. शेतकरी बांधवांची वेगवेगळी जनावरे या कृषी महोत्सवात अतिशय चांगली आहेत.

लहान शेतकऱ्यांना पुढे आणण्यासाठी राज्य तसेच केंद्र सरकार वेगवेगळ्या प्रकारची यंत्रणा, योजना राबवत आहे. चांगलं काम करणाऱ्या शेतकऱ्यांना व शेतकऱ्यांसाठी काम करणाऱ्या चांगल्या कंपन्यांना पाठबळ देण्याचे काम, राज्य सरकार करेल. भविष्यकाळात शेतकरी सुखी कसा होईल यासाठी प्रयत्न करणार असून, शेती छंद व आवड म्हणून शेतकऱ्यांनी करावी, नवीन पद्धतीने प्रयोग शेतकऱ्यांनी करावेत. परकीय चलन आपल्याला शेतीच्या शेतमालातून मिळते आहे. म्हणूनच देशाची प्रगती मोठ्या पद्धतीने होत आहे. राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे अतिशय दिलदार माणूस आहे. राज्याला प्रगतीकडे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार घेऊन निघाले आहेत. येणारा काळ शेतकरी बांधवांसाठी चांगला असेल.



### इंदापूरचा शेतकरी प्रयोगशील -भरणे

» क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, शेतकऱ्यांनी शेतीमध्ये अनेक पद्धतीचे बदल केले आहेत, पुढील काळात देखील अद्यावत पद्धतीने शेतकऱ्यांनी शेती करणे गरजेचे आहे. कमी खर्चात जास्त उत्पन्न घेणारा शेतकरी इंदापूरचा आहे. नाशिक मध्ये उत्पादनातून क्रांती शेतकरी घडवतोय. त्या पाठोपाठ शेतीमध्ये नवीन प्रयोग राज्यात फक्त इंदापूर तालुका नाशि क आहे. द्राक्ष केळी पोपई, पेरू, ऊस उत्पादक शेतकरी कष्ट करून मेहनत करून यशस्वी पिकवतो आहे. याचा मला अभिमान वाटतो इंदापूर पाच दिवसीय कृषी महोत्सवाचे उद्घाटन मंत्री माणिकराव कोकाटे, दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते झाले.

### शेतकऱ्यांचा सन्मान

» विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला यामध्ये केळी बागेतून अधिक उत्पन्न घेणारे प्रगतशील बागायदार किशोर मोहिते, ऊस उत्पादक आदर्श शेतकरी शरद कदम, निर्यातक्षम डाळिंब उत्पादक काकासो पडळकर, पेरू उत्पादक आदर्श शेतकरी उत्तम शेंडे, द्राक्ष उत्पादक शिवाजी करे, ड्रॅगन फूड उत्पादक शेतकरी मारुती व्यवहारे, दुग्धविकास क्षेत्रात मोतीलाल सुरडे, तांत्रिक ड्रोन फवारणी पायलट सोनाली कदम, नियमित शेतमाल खरेदी विक्री नगरे, मासे मासळी योगेश शितोळे, प्रवीण ओंबळे, बाळूराम चौधरी, संदीप शिंदे, उदयशेठ शहा यांचा सन्मान कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते पार पाडला.

---

# सरकार खेळ करतंय, हेलपाटे मारायला लावतंय : डॉ. बाबा आढाव

## अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेचे माले (ता. मुळशी) येथे आयोजन केले होते. यावेळी डॉ. आढाव बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

मुळशीकरांच्या नावामध्ये सत्याग्रह आहे. न्याय पाहिजे असेल तर न्याय मिळवून देणारे राज्य पाहिजे. हक्क पाहिजे असतील तर तुरुंगात जायची तयारी ठेवा, 'सत्याग्रहाची भाषा' करावी लागेल. आश्वासन देणारे निघून जातात, हातात कागद राहतात. सरकार खेळ करतंय, हेलपाटे मारायला लावतंय, जे चाललेय ते बरोबर नाही. असे प्रतिपादन कष्टकऱ्यांचे नेते डॉ. बाबा आढाव यांनी केले.

मुळशी सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त मुळशी धरणग्रस्तांच्या न्याय्य हक्कांवर व प्रलंबित मागण्यांवर चर्चा, मुळशीसह राज्यातील अन्य धरणग्रस्तांसोबत संवाद व्हावा, या मंथनातून धरणग्रस्तांचा मुद्दा केंद्रस्थानी यावा, यासाठी अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेचे माले (ता. मुळशी) येथे आयोजन केले होते. यावेळी डॉ. आढाव बोलत होते. नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या डॉ. मेधा पाटकर, डॉ. भारत पाटणकर, कृष्णात खोत, जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयक सुनिती सु. र., ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, विंदा भुस्कुटे, विजय भुस्कुटे, रामचंद्र ठोंबरे, सविता दगडे, अमित कंधारे, रवींद्र कंधारे, कोमल वाशिवले, स्वाती ढमाले, कालिदास गोपालघरे, शांताराम इंगवले, दीपक करंजावणे, सचिन खैरे आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. भारत पाटणकर म्हणाले, जमिनीला पाणी मिळाले पाहिजे. निर्माण होणाऱ्या उद्योगांमध्ये प्राधान्य पाहिजे. धरणग्रस्तांच्या डोळ्यांत अश्रू नाही राग यायला पाहिजे. डॉ. सदानंद मोरे म्हणाले, धरणग्रस्तांकडे दुर्लक्ष करणे टाटांच्या दानशूर कल्चरला हे शोभत नाही. सर्वांनी मुळशीच्या त्यागाची दखल घेण्याचे, सहभागी होण्याचे आवाहन करा. या लढ्यात कोणालाही वर्ज्य करु नका. कादंबरीकार लेखक बबन मिंडे या परिसंवादाचा समारोप करताना म्हणाले, शंभर वर्षांपूर्वी मुळशी सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुढील पिढ्या आज कुठे आहेत, याचा शोध घेतला तरी धरणग्रस्तांच्या आंदोलनाचं पुढं काय होतं, याचं उत्तर सापडेल.

मुळशी व महाराष्ट्रातील धरणग्रस्तांचे लढे या परिसंवादात राज्यभरातील विविध प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्तांचे प्रतिनिधींनी संवाद साधला. अखिल महाराष्ट्र मुळशी परिषदेचे अध्यक्ष श्रीपाद धर्माधिकारी यांनी समारोप केला. आयोजक अनिल पवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन चेतन कोळी, राजेश सातपुते, महेश मालुसरे, दिग्विजय जेधे, मंदार मते, जिंदा सांडभोर, मारुती गोळे, निलेश शेंडे, रोशन मोरे यांनी केले.




### मुंबईतील अधिकारी नियुक्ती करूनही कामे होईना

» मुंबईतील परिवहन कार्यालयातील संगणक विभागातील परिवहन उपायुक्त म्हणून नेमणूक असलेले संदेश चव्हाण यांची पिंपरी-चिंचवड येथे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना प्रत्यक्षात ऑनलाइन आणि टेक्निकल कामांचा सर्वाधिक अनुभव आहे. मात्र, तरीदेखील या कार्यालयाला अनेक तांत्रिक समस्याला सामोरे जावे लागत आहे.

> 'मुळशीचा करार संपल्यावर गुपचूप मुदत वाढवली. मुळशीचा इतिहास उकरुन काढत, समोर आणला पाहिजे. पाण्याबाहेर उरलेली 14 हजार एकर जमीन धरणग्रस्तांना द्यावी. मुळशी धरणग्रस्तांच्या पाठीशी राष्ट्रीय आंदोलनांची ताकद उभी करू. जलाशयावर हक्क दाखवण्याची गरज आहे.
>
> - डॉ. मेधा पाटकर, नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या